# प्रसिध्दी पत्रक

दिनांक : ०८/०३/२०२४

**आरोपी लोकसेवक प्रियंका लोहगावकर यांनी अहिल्याबाई सिंचन विहीर योजने अंतर्गत विहीर मंजूरीचा प्रस्ताव मंजुर करण्यासाठी सहा हजारांची लाच त्यांनी व त्यांचे पती यांनी स्विकारले म्हणुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे.धर्माबाद गुरनं ४८/२०२४ कलम ७,१२ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ |
| गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक ०७/०३/२०२४ रोजी २१.५० वा. स्टे.डा नोंद नं ३२ वर |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | १) प्रियंका किशनराव लोहगावकर, वय २९ वर्षे, व्यवसाय कंत्राटी तांत्रिक सहायक, पंचायत समिती धर्माबाद, ता. धर्माबाद, जि. नांदेड.<br>२) मकरंद गंगाधर काळेवार, वय ३७ वर्षे, खाजगी इसम (आलोसे यांचा पती) दोघे रा. आंध्रा बसस्टॅड, सरस्वती नगर, धर्माबाद, जि. नांदेड. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ८,००० /– रूपये |
| लाच स्विकारली रक्कम | ६,०००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे नावे मौ. पाटोदा (बु.) ता. धर्माबाद, जि. नांदेड येथे गट क्र. ४४४ मध्ये एक एकर शेतीमध्ये त्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून अहिल्याबाई सिंचन विहीर योजने अंतर्गत विहीर मंजूरीचा प्रस्ताव दि. ०८/०१/२०२४ रोजी पंचायत समिती धर्माबाद येथे दाखल केला होता. सहायक कार्यक्रम अधिकारी, पंचायत समिती, धर्माबाद यांनी सदर प्रस्तावाची दखल घेवून टिपणी तयार करून तांत्रिक सहायक श्रीमती प्रियंका लोहगावकर यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी दिली. तक्रारदार यांनी तांत्रिक सहायक श्रीमती प्रियंका लोहगावकर यांचे कडे सिंचन विहीरीचे कामासंबंधाने चौकशी करण्यासाठी गेले असता, तांत्रिक सहायक श्रीमती प्रियंका लोहगावकर यांनी तक्रारदार यांना रू.८,०००/– ची मागणी केली. सदरची रक्कम रु.८,०००/– ही लाच असल्याचे तक्रारदार यांना खात्री झाल्याने त्यांना ती देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे तक्रार दिली.<br>दि. ०७/०३/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पथकाने तक्रारदार यांना लाच मागणी पडताळणीसाठी पाठविले असता, आरोपी लोकसेवक तांत्रिक सहायक श्रीमती प्रियंका लोहगावकर यांनी पंचासमक्ष रू. ८,०००/– ची मागणी करून तडजोडीअंती रू.६,०००/– रूपये स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरून तांत्रिक सहायक श्रीमती प्रियंका लोहगावकर यांनी पंचायत समिती कार्यालय, धर्माबाद, ता. धर्माबाद, जि. नांदेड येथे पंचा समक्ष रू.६०००/– लाच स्विकारून त्यांचे पती मकरंद काळेवार यांच्या कडे दिले. ला.प्र.वि., नांदेड पथकाने सदरची लाच रक्कम रु. ६,०००/– त्यांचे पती मकरंद काळेवार यांच्याकडून पंचासमक्ष जप्त केली.<br>आरोपी लोकसेवक तांत्रिक सहायक श्रीमती प्रियंका लोहगावकर व त्यांचे पती मकरंद काळेवार यांना ताब्यात घेऊन पो.स्टे. धर्माबाद येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| सापळा पथक | सदरची कार्यवाही ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्र, नांदेड चे पोलीस अधीक्षक डॉ.राजकुमार शिंदे, यांचे मार्गदर्शनाखाली, पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उप अधीक्षक राजेंद्र पाटील, तसेच सापळा कार्यवाही पथक पोलीस निरीक्षक कालीदास ढवळे, सपोउपनि गजेंद्र मांजरमकर, पोहेकॉ/रसुल शेख, मपोहेकॉ मेनका पवार, चापोह/मारोती सोनटक्के, सर्व लाप्रवि नांदेड युनिट |
| गुन्हयाचा तपास | कालीदास ढवळे, पोलीस निरीक्षक, अँटी करप्शन ब्युरो, नांदेड |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क कमांक :– 02462–253512<br>टोल फी कमांक– 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उपअधीक्षक 7350197197 |
| ई–मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई–मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner